Sonali
yesterday at 13:35

-: प्रेसनोट :-

**पिंपरी पोलीस ठाणे हद्दित राहणारा कुप्रसिध्द गुन्हेगार, वैभव चोखोबा हातांगळे, यास पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त, मा. श्री. विनय कुमार चौबे सो, यांनी एम.पी.डी.ए. कायद्याखाली स्थानबध्द करण्याचे आदेश पारीत केले.**

आगामी लोकसभा निवडणुकीचे अनुषंगाने पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हद्दित गुन्हे करणारे गुन्हेगार यांचा अभिलेख तपासून त्यांचेवर मोका व एमपीडीए कायद्या अंतर्गत परीणामकारक कारवाई करण्याचे आदेश मा. पोलीस आयुक्त सो. पिंपरी चिंचवड यांनी दिलेले असून त्याप्रमाणे कारवाई सुरू करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने पिंपरी पोलीस ठाणेचे हद्दित कोयता सारखी जीवघेणी हत्यारांसह शस्त्रासह गंभीर दुखापत करणे, दुखापत करणे, बेकायदेशीर जमाव जमवून दंगा करणे, तडीपार आदेशाचा भंग करणे व बेकायदेशीररित्या विनापरवाना घातक शस्त्रे जवळ बाळगणे यासारखे ०७ गुन्हे असणारा कुप्रसिध्द गुन्हेगार नामे, **वैभव चोखोबा हातांगळे, वय-२४ वर्षे, रा. बनसाळ गल्ली, गांधीनगर, पिंपरी, पुणे,** यास पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त, मा. श्री. विनय कुमार चौबे सो, यांनी एम.पी.डी.ए. कायद्याखाली स्थानबध्द करण्याचे आदेश दिल्याने त्यास येरवडा मध्यवर्ती कारागृह, येरवडा, पुणे, येथे दिनांक १५/०३/२०२४ रोजी सदर कायद्यान्वये स्थानबध्द् करण्यात आले आहे.

सदर प्रस्ताव त्रुटी विरहित तसेच परिपूर्णरित्या सादर करण्याची कामगीरी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त, विनय कुमार चौबे, अपर पोलीस आयुक्त, वसंत परदेशी, संदिप डोईफोडे, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), बाळासाहेब कोपनर, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे१, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली अनिल देवडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पी.सी.बी. गुन्हे शाखा, रुपाली बोबडे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), पिंपरी पोलीस ठाणे, पोलीस हवालदार, सचिन चव्हाण, व्यंकप्पा कारभारी पी.सी.बी. गुन्हे शाखा, पो.ना. ओंकार बंड, पिंपरी पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड यांनी केली आहे.

**( संदिप डोईफोडे )**
पोलीस उप-आयुक्त (गुन्हे)
पिंपरी चिंचवड.